# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** इगतपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0088 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 13:30

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 25/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/05/2025
**Time From (वेळेपासून):** 11:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/05/2025 **Time (वेळ):** 12:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/05/2025 13:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगरपालिका कार्यालय, इगतपुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ययाती प्रकाश पारख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ईगतपुरी,इगतपूरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ईगतपुरी,इगतपूरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822400789

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरज पाटील | | | 1. संगणक अभियंता,नगरपालिका कार्यालय, इगतपुरी ,इगतपूरी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नितीन लोखंडे | | | 1. कनिष्ठ लिपीक,नगरपालिका कार्यालय, इगतपुरी ,इगतपूरी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 3 | श्री.बोराडे | | | 1. अकाउंटंट,नगरपालिका कार्यालय, इगतपुरी ,इगतपूरी, नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद इगतपुरी पोलीस स्टेशन,
दि.14/05/2025

मी ययाती प्रकाश पारख, वय 41 वर्षे, व्यवसाय कॉम्प्युटर, सीसीटीव्ही विक्री व देखभाल दुरुस्ती रा. ईगतपुरी, जि. नाशिक मो.नं. 9822400789

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह रहात असुन मी कॉम्प्युटर, सीसीटीव्ही विक्री व देखभाल दुरुस्ती व्यवसाय करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी ईगतपुरी नगरपालिका येथे सन 2024-2025 या वर्षात सीसीटीव्ही, कॉम्प्युटर, प्रिंटर पुरविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याचे टेंडर घेतलेले असुन त्याप्रमाणे मी ईगतपुरी नगरपालिका हद्यीतील सीसीटीव्ही कॅमेरे व कॉम्प्युटर देखभाल दुरुस्तीचे काम केलेले आहे. सदर कामाचे बिल 17,50,000/- (सतरा लाख पन्नास हजार) रुपये इतके झालेले असुन सदरचे बिल ईगतपुरी नगरपालिका येथील बिलाचे पैसे दिनांक 23/04/2025 पर्यंत मिळालेले नसल्याने मी नगरपालिका ईगतपुरी येथील अकाउंट विभागातील श्री.बोराडे यांचेकडे वारंवार गेलो असता त्यांनी सांगीतले की, तुमचे बिल काढण्याच्या मोबदल्यात मला व मुख्याधिकारी आढाव सर, सुरज पाटील, संगणक अभियंता, नितीन लोखंडे, कनिष्ठ लिपीक अशा सर्वांना मिळुन बिलाच्या एकुण रक्कमे पैकी 27 टक्के दयावी लागेल. त्यानंतर मी दिनांक 23/04/2025 रोजी ईगतपुरी नगरपालिका येथे गेलो असता तेथे बोराडे व नितीन लोखंडे यांना भेटलो असता त्यांनी माझे बिल काढुन देण्याच्या मोबदल्यात 27 टक्केवारी रक्कम आणली का बाबत विचारले असता तेव्हा मी त्यांना बोलो की, सध्या माझेकडे पैसे नाहीत असे बोलल्यावर ते मला म्हणाले की, आम्ही तुझे शिल्लक असलेल्या एकुण बिलापैकी काही रक्कम तुला अदा करतो त्या रक्कमेतुन तु रोख रक्कम बँकेतुन काढुन आम्हाला 27 टक्क्याप्रमाणे आणुन दे असे सांगीतल्या प्रमाणे त्यांनी दिनांक 24/04/2025 रोजी माझे अकाउंटला 8,67,000/-रुपये एनईएफटी ने जमा केले व त्यावेळेस मला सांगीतले की, तुझे अकाउंटला आम्ही 8,67,000/- रुपये जमा केले असुन सदर रक्कमेच्या 27 टक्के प्रमाणे एकुण 1,90,000/- हजार होतात त्यापैकी किमान 1,70,000/- रुपये दयावेच लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.त्यानंतर मला सी.ओ. आढाव सर, अकाउटंट श्री. बोराडे, सुरज पाटील, संगणक अभियंता, नितीन लोखंडे कनिष्ठ लिपीक यांना लाच म्हणुन पैसे देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथे दि. 25/05/2025 रोजी संपर्क करुन माझी इगतपुरी नगरपालिका येथील वरील नमुद अधिकारी कर्मचारी यांना लाच देण्याची ईच्छा नाही तरी मी दिनांक 25/4/2025 रोजी मी केलेल्या कामाचे बिलाचे उर्वरीत रक्कमेसंदर्भात बोलणेकरिता इगतपुरी नगरपालिका येथे जाणार आहे. तेव्हा तेथील सी.ओ.आढाव सर, अकाउटंट श्री. बोराडे, सुरज पाटील, संगणक अभियंता, नितीन लोखंडे कनिष्ठ लिपीक यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द तक्रार असल्याचे सांगीतल्याने मला लाप्रवि कार्यालयातील पोनि. वालझाडे यांनी संपर्क करुन इगतपुरी येथील शिरोळे फार्म येथे येणेबाबत कळविलेने मी सदर ठिकाणी हजर झालो असता तेथे सापळा कारवाई कामी शासकीय पंच म्हणुन मा. नगरभुमापन अधिकारी नाशिक 1 चे परिरक्षण भुमापक पंच श्री.गोविंद जेडघुले व पंच श्री.विकास

देशपांडे असे पोनि. अमोल वालझाडे सापळा पथकासह हजर होते. तेथे मी माझी तक्रार थोडक्यात तोंडी सांगीतली त्यानंतर पोनि.वालझाडे सर यांना दोन्ही पंचासमक्ष मी माझी तक्रार माझा हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी व पोनि. वालझाडे,आणि दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर माझे तक्रारीनुसार इगतपुरी नगरपालिका येथील मुख्याधिकारी आढाव,अकाउटंट श्री. बोराडे, सुरज पाटील, संगणक अभियंता, नितीन लोखंडे कनिष्ठ लिपीक हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करण्याकरीता मला पंचासमक्ष व्हॉईस रेकार्डर लावुन माझेकडील चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.15, एच.वाय.2671 ने पंच क्र.1 श्री.गोविंद जेडघुले यांचे सोबत इगतपुरी नगरपालिका येथे खात्री करणेकामी योग्य त्या सुचना देवून रवाना केले असता आंम्ही इगतपुरी नगरपालिका येथे पोहचलो त्यावेळी मुख्याधिकारी श्री.आढाव व श्री. बोराडे अकाउंन्टट हे कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची व माझी भेट झाली नाही. परंतु मी माझे कामासंदर्भात लोकसेवक सुरज पाटील, लोकसेवक नितीन लोखंडे,यांची भेट घेतली असता त्यांनी माझे कामाचे एकुण बिल रक्कम रु. 17,50,000/-रुपये असुन त्यापैकी 8,67,000/- रुपयाचा चेक मला दिला असुन त्या बिलाचे मोबदल्यात लोकसेवक नितीन लोखंडे, लोकसेवक सुरज पाटील,यांनी माझेकडे सदर बिलाच्या मोबदल्यात त्यांचेसाठी व मुख्याधिकारी आढाव तसेच श्री.बोराडे यांचेसाठी सर्वांना मिळुन 27 टक्के प्रमाणे एकुण 1,90,000/- हजार रुपये होतात त्यापैकी किमान 1,70,000/- दयावेच लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.त्याबाबत आमचे भेटीदरम्यान झालेले संभाषण सापळा पथक व पंचांनी ऐकले. तसा सविस्तर पंचनामा पोनिरी.वालझाडे साहेब यांनी केला.

त्यानंतर लाचेची रक्कम देण्याकरिता मी हजर केलेल्या 500 रुपये दराच्या 340 चलनी नोटा असे एकुण 1,70,000/-रुपयांच्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन मला व पंच नं. 1 श्री. जेडगुले यांना इगतपुरी नगरपालिका कार्यालय येथे रवाना केले त्यावेळी माझे लोकसेवक लोखंडे,बोराडे,यांच्याशी भेटी दरम्यान झालेल्या संभाषणात लोखंडे व बोराडे यांनी लाचेची मागणी करुन प्रोत्साहन दिले व त्यावेळी लोखंडे यांनी सांगितले की, मी तुम्हाला सायंकाळी फोन करतो असे म्हणुन माझ्याकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच सायंकाळी फोन देखील केला नाही.दि.26/04/2025 व दि.27/04/2025 रोजी शासकीय सुटटी असल्याने इगतपुरी नगरपालिका कार्यालय बंद होते.

दिनांक 28/4/2025 रोजी पंच नं. 1 जेडगुले यांच्यासोबत माझेकडे लाचेची रक्कम देवुन इगतपुरी नगरपालिका येथे गेलो असता सदर वेळी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची मिटींग सुरु असल्याने कोणाचीही भेट झाली नाही.

त्यानंतर मला व पंच नं. 1 जेडगुले यांना दिनांक 29/4/2025 रोजी माझेकडे लाचेची रक्कम देवुन इगतपुरी नगरपालिका येथे लोकसेवक नितीन लोखंडे यांचे भेटीकरिता रवाना केले होते व सदर लाचेची रक्कम लोकसेवक लोखंडे यांना देण्यापुर्वी सी.ओ. साहेबांची भेट घेवुन कामाची चर्चा करुन ते लाचेची मागणी करतात अगर कसे ? यांची पडताळणी करणेकामी पोनिरी. श्री. वालझाडे यांनी सुचना दिल्या होत्या व सी.ओ. कार्यालयात आहेत अगर कसे ? याबाबत खात्री करण्याबाबत सांगितले असता मी माझे ओळखीचे इसमाकडुन खात्री केली असता सी.ओ. साहेब हे मिटींगकामी सिन्नर व नाशिक येथे असल्याचे सांगितल्याने त्यांची व माझी भेट झाली नाही. दि. 30/04/2025 व दि.01/05/2025 रोजी शासकीय सुटटी असल्याने त्यावेळी पुन्हा सदरची कार्यवाही ही दिनांक 02/05/2025 रोजी करण्याबाबत ठरविण्यात आले.

दिनांक 02/05/2025 रोजी मला व पंच नं. 1 जेडगुले यांना माझेकडे लाचेची रक्कम देवुन इगतपुरी नगरपालिका येथे लोकसेवक नितीन लोखंडे यांचे भेटीकरिता रवाना केले होते व सदर लाचेची रक्कम लोकसेवक लोखंडे यांना देण्यापुर्वी सी.ओ. साहेबांची भेट घेवुन लाचेची मागणी बाबत खात्री करणेकामी पोनिरी. श्री. वालझाडे यांनी सुचना दिल्या होत्या त्यावेळी मी व पंच नं.1 जेडगुले असे इगतपुरी नगरपालिका येथे गेलो त्यावेळी मी इगतपुरी नगरपालिका येथे जावुन सी.ओ. सरांची भेट घेतली असता त्यांनी माझेकडे कोणतेही लाचेची मागणी केली नाही. त्यांनतर मी पुन्हा लोकसेवक लोखंडे यांचेकडे लाचेची रक्कम देण्याकरिता गेलो असता त्यांनी लाचेची रक्कम घेण्यास नकार दिला. तसेच लोकसेवक सुरज पाटील हे देखील कार्यालयात उपस्थित नव्हते तसेच लोकसेवक बोराडे हे मी कार्यालयात गेलो त्यावेळी मला पाहुन कार्यालयातुन बाहेर निघुन गेले यावरुन त्यांना संशय आला असल्याने लोकसेवक नितीन लोखंडे, लोकसेवक बोराडे व लोकसेवक सुरज पाटील हे भविष्यात माझ्याकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली आहे.

तरी मी दिनांक 25/4/2025 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक सुरज पाटील, लोकसेवक नितीन लोखंडे, लोकसेवक श्री.बोराडे,यांनी माझे कामाचे एकुण बिल रक्कम रु. 17,50,000/-रुपये असुन त्यापैकी 8,67,000/- रुपयाचा चेक मला दिला असुन त्या बिलाचे

मोबदल्यात स्वतःकरिता तसेच मुख्याधिकारी यांचेकरिता सर्वाचे मिळुन 27 टक्के प्रमाणे एकुण 1,90,000/- हजार रुपये होतात त्यापैकी किमान 1,70,000/- लाचेची मागणी करुन दयावेच लागतील असे म्हणुन एकमेकांना लाच देणेस प्रोत्साहन दिले म्हणुन त्यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहीली असुन ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हि फिर्याद दिली,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

rahul vasantrao tasare(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

1438

पोलीस ठाणे अंमलदार
इगतपुरी पोलीस स्टेशन
नाशिक ग्रामिण

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** rahul vasantrao tasa

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**